# प्रकरण 2 रे :- संविधानीक तरतुदी.

## 1] मुलभूत हक्क :-

① प्रस्तावना :-

"व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी समाजमान्य नैतिक कृतीला हक्क असे म्हणतात" नागरिकांच्या मुलभूत हक्काचा सविस्तर विचार भारतीय संविधानाच्या तिसऱ्या प्रकरणात कुलम 12 ते 35 मध्ये करण्यात आलेला आहे. भारताने मुलभूत हक्काचा स्विकार अमेरिकेकडून केलेला आहे. व्यक्तीच्या सामाजीक आर्थीक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकासासाठी व लोकशाहीच्या यशासाठी मुलभूत हक्काची आवश्यकता असते. या मुलभूत हक्कास न्यायालयीन संरक्षण ही प्राप्त झाले आहे. भारतीय संविधानातील कोणताही हक्क अमर्याद स्वरूपाचा नाही. प्रत्येक हक्कावर योग्य निर्बंध घालण्यात आले आहेत इतर देशाच्या तुलनेने सविस्तरपणे हक्काची मांडणी करण्यात आलेली आहे सकारात्मक व नकारात्मक अधिकाराची तरतूद देशातील नागरीक व व्यक्तीसाठी करण्यात आलेली आहे. असे असलेतरी संकटकाळात (आणिबाणीच्या काळात) नागरीकांचे मुलभूत हक्क स्थगित केले जातात. मुलभूत हक्कात संशोधन करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आलेला आहे.

नागरीकांच्या अधिकार किंवा हक्काबाबत सर्वप्रथम विचार इंग्लंडच्या 1215 च्या मॅग्नाकार्टाच्या सनदेमध्ये मांडण्यात आलेला आहे. अमेरिका 1776 ची अमेरिकन राज्यक्रांती 1789 ची फ्रेंच राज्यक्रांती मानवी हक्काच्या संदर्भात आलेली आहे. 10 डिसेंबर 1948 ला संयुक्त राष्ट्रसंघटनेनेही मानवी हक्काचा जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला. त्यावरून आज संपूर्ण जगभरा

Scanned with CamScanner

मध्ये 10 डिसेंबर हा दिवस मानवी हक्क दिन म्हणून साजरा केला जातो.

② भारतीय संविधानातील मुलभुत अधिकार

भारताच्या मुळ संविधानात कलम 12 ते 35 मध्ये एकूण 7 मुलभूत अधिकाराचा उल्लेख करण्यात आला होता. परंतु 1978 च्या 44 व्या घटनादुरुस्तीनुसार संपत्तीचा अधिकार मुलभूत अधिकाराच्या यादीतून कमी करण्यात आला त्यामुळे 1978 पासून मुलभूत हक्काच्या यादीत 6 अधिकाराचा समावेश आहे. संविधानाच्या कलम 12 मध्ये राज्य म्हणजे काय ते स्पष्ट करण्यात आले आहे. 13 व्या कलमात मुलभूत हक्काच्या विरुद्ध कायदा करण्याचा अधिकार संसदेला नाही हे सांगण्यात आले आहे.

1) समतेचा अधिकार :- (कलम 14 ते 18)

संविधानाच्या कलम 14 ते 18 मध्ये समतेच्या हक्काचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामध्ये

① कायद्यासमोर समानता :- 14

कलम 14 नुसार भारतातील सर्व नागरीकांना कायद्यासमोर समान लेखले जाईल. जात, धर्म, वंश, लिंग, प्रांत, रंग, श्रीमंत-गरिब, वरिष्ठ-कनिष्ठ असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. हा मर्यादीत हक्क आहे.

② भेदभाव नसावा 15

कलम 15 नुसार सार्वजनिक ठिकाणी

जात, धर्म, वंश, लिंग, इ. च्या आधारावर भेदभाव केला जाणार नाही. हा ही हक्क मर्यादीत आहे.

③ **समान संधी :- 16**

कलम 16 नुसार सरकारी नोकरी मध्ये प्रवेश देताना भेदभाव न करता पात्रतेनुसार सर्वांना समान संधी दिली जाईल. परंतू हा हक्क मर्यादीत आहे. – समान जागा स्त्रियांसाठी होण्यासाठी त्यांना प्राधान्य

④ **अस्पृश्यता बंदी :- 17.**

कलम 17 नुसार अस्पृश्यता दूर करण्यात आली. अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा आहे. अस्पृश्यता दूर झाल्याशिवाय समता प्रस्थापित होवू शकत नाही. हा हक्क मर्यादित आहे – रोगी माणूस

⑤ **पदव्यांची समाप्ती :- 18**

कलम 18 नुसार पदव्या नष्ट करण्यात आल्या उदा. रावसाहेब, रावबहादूर, नवाब इ. पदव्या दिल्या जात होत्या. त्यांना विशेष अधिकार दिले जात होते. या विशेष अधिकारामुळे समाजात भेदभाव निर्माण होत होता तो भेदभाव दूर करण्यासाठी कायद्याने पदव्या नष्ट करण्यात आल्या हा हक्क मर्यादित आहे. – सरकार भारतरत्न ही पदवी देते.

2) **व्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार :- (19 ते 22)**

संविधानाच्या कलम 19 ते 22 मध्ये व्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार

चा उल्लेख करण्यात आलेला आहे. व्यक्ती विकासासाठी व्यक्तीच्या अंगी असलेल्या सदगुणांची वृद्धी होण्यासाठी व्यक्तिस्वातंत्र्याची आवश्यकता असते. तसेच त्यावर योग्य उचित बंधने ही टाकण्यात आलेली आहेत.

① कलम 19 व्यक्तीला खालील अधिकार देण्यात आलेला आहे :-

मर्यादा

- भाषण व विचार स्वातंत्र्य - शिव्या देणे, देशाच्या विरुद्ध
- सभा स्वातंत्र्य -
- संस्था / संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य - चोरांच्या संघटना स्थापन करता येत नाही
- संचार स्वातंत्र्य -
- वास्तव स्वातंत्र्य -
- संपत्ती कमविणे, खर्च करण्याचे स्वातंत्र्य -
- व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य. इ. या प्रत्येक स्वातंत्र्यावर मर्यादा आहेत.

② कलम 20 नुसार :-

20 व्या कलमानुसार अपराधी व्यक्तीला दोष सिद्ध करण्याचे स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. गुन्हेगारांनी केलेला गुन्हा जो पर्यंत सिद्ध होत नाही, तोपर्यंत त्याला शिक्षा देता येत नाही. एका गुन्ह्यासाठी एकच शिक्षा दिली जाते. कायद्याने सांगितलेल्या शिक्षेपेक्षा जास्त शिक्षा देता येत नाही. व्यक्तीला स्वतः विरुद्ध साक्ष देण्यासाठी भाग पाडले जाणार नाही.

③ कलम 21 नुसार :-

21 व्या कलमानुसार व्यक्तीच्या जिवीत स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यात आले आहे. कायद्या

ने ठरवून दिलेल्या पद्धतीशिवाय अन्य तऱ्हेने कोणत्याही व्यक्तीचे जिवन स्वातंत्र्य किंवा वयक्तीक स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही.

(2) कलम 22नुसार :-

22 व्या कलमानूसार व्यक्तीला बंदीकरण व नजरबंदीपासून संरक्षण प्राप्त झाले आहे. अटक झालेल्या व्यक्तीला आपणास कोणत्या कारणासाठी अटक झाली हे जाणून घेण्याचा अधिकार आहे. वकिलाचा किंवा कायदेपंडिताचा सल्ला घेवून आपला बचाव करण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला आहे. अटक झालेल्या व्यक्तीला 24 तासाच्या आत न्यायालयासमोर उभे केले पाहिजे.

3) शोषनाविरुद्धचा अधिकार :- 23 व 24.

संविधानाच्या कलम 23 व 24 मध्ये शोषनाविरुद्धचा हक्क सांगण्यात आलेला आहे. 23 व्या कलमानूसार व्यक्तिचे व्यक्तिकडून शोषन केले जाणार नाही. मानसाची खरेदी-विक्री केली जाणार नाही. देशातून गुलामगीरी शोषण नष्ट करण्यासाठी तसेच सक्तीने काम करुन घेण्यास बंदी घालण्यात आलेली आहे. 24 व्या कलमानूसार 14 वर्षाखालील लहान मुला-मुलींना खाणी-कारखाने व इतर धोक्याच्या ठिकाणी काम करण्यास बंदी घालण्यात आली.

4) धर्मस्वातंत्र्याचा हक्क :- 25 ते 28

संविधानाच्या कलम 25 ते 28

मध्ये धर्मस्वातंत्र्याचा अधिकार स्पष्ट करण्यात आलेला आहे. 25 व्या कलमानुसार प्रत्येक व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार कोणताही धर्म स्विकारण्याचे प्रचार करण्याचे पूजा विधी उपासना करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. 26 व्या कलमानुसार प्रत्येकाला धार्मिक संस्था स्थापन करण्याचा अधिकार असतो. 27 व्या कलमानुसार धर्माच्या नावावर कोणासही सक्तीने पैसा गोळा करता येणार नाही. 28 व्या कलमानुसार शिक्षणसंस्थेमधून धार्मिक शिक्षण देण्यावर बंदी घालण्यात आलेली आहे.

5) संस्कृती आणी शिक्षणाचा अधिकार :- 29 व 30

भारतीय संविधानाच्या कलम 29 व 30 मध्ये संस्कृती व शिक्षणाचा हक्क सांगण्यात आलेला आहे. 29 व्या कलमानुसार भारतामध्ये राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाला आपली भाषा, कला, लिपी, आणी संस्कृतीची जोपासना करण्याचा अधिकार आहे. भारतातील अल्पसंख्यांकानाही आपल्या संस्कृतीचे संरक्षण करता यावे या हेतूने हा अधिकार प्रत्येकाला देण्यात आलेला आहे. 30 व्या कलमानुसार प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला आहे. अल्पसंख्याक लोकांनाही स्वतःच्या आवडीनुसार धर्म किंवा भाषेच्या आधारावर शिक्षण संस्था चालविण्याचा अधिकार आहे. देशातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या आवडीनुसार व प्राप्तीनुसार शिक्षण घेण्याचा अधिकार आहे.

⑥ संपत्तीचा अधिकार :- 31

1978 मधील ४४ व्या घटना-दुरुस्तीनुसार मूलभूत हक्कांच्या यादीतून संपत्तीचा अधिकार कमी करण्यात आला आहे.

⑦ घटनात्मक उपाय योजनेचा अधिकार :- / दाद मागण्याचा अधिकार :- 32

नागरीकांच्या वरील सर्व मूलभूत अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी संविधानाच्या कलम 32 ते 35 मध्ये घटनात्मक उपाययोजनेच्या अधिकाराची तरतूद करण्यात आली आहे. हा अधिकार म्हणजे राज्यघटनेचा आत्मा आहे. या अधिकाराद्वारे नागरिकांना पाच प्रकारचे अर्ज करून आपल्या हक्काचे संरक्षण करता येते.

Ⓘ बंदी प्रत्यक्षीकरण :-

यास habies corpus असे म्हणतात, habies corpus हा लॅटिन शब्द असून लॅटिन भाषेत त्याचा अर्थ आम्हाला ~~सशिक~~ शरीर द्या कोणत्याही व्यक्तीला बेकायदेशिरपणे अटक झाली असेल, अन्याय पूर्वक दंड केला असेल तर ती व्यक्ती स्वतः किंवा नातलगाकडून अर्ज करू शकते. याला बंदीप्रत्यक्षिकरण असे म्हणतात.

Ⓘⓘ परमादेश ( mendamas )

mendamas हा लॅटिन शब्द असून लॅटिन भाषेत त्याचा अर्थ आम्ही आज्ञा देतो असा होतो. एखादी सरकारी व्यक्ती किंवा संस्था आपल्या

कलम 33 देशातील सैनीक, पोलीस, गुप्तचरांचे लोक आहेत यांच्या मुलभूत अधिकारामध्ये बदल करण्याचा अधिकार संसदेला आहे,

कलम 34 एखादया लष्करी कायदयानुसार एखाद्या विशिष्ठ भागामध्ये तो कायदा लागू केला असेल तर त्या कायदयानुसार तो कोणालाही वापरता येत नाही यावर बंधने घातले आहेत, कर्तव्याचे पालन करत नसेल त्यामुळे इतरावर अन्याय होत असेल तर आपणास न्यायालयामध्ये अर्ज करता येतो त्यास परमादेश असे म्हणतात.

III प्रतिशेध :-

एखादा खटला कनिष्ठ न्यायालयात चालत असताना तो नियमानुसार चालत नसल्यास किंवा त्या न्यायालयाला तो खटला चालविण्याचा कायदेशिर अधिकार नसल्यास त्या खटल्याची सुनावणी तहकूब करावी असा अर्ज वरिष्ठ न्यायालयाकडे करता येतो. त्यास प्रतिषेध असे म्हणतात

IV अधिकार पृच्छा :-

पात्रता नसताना जर कोणी सरकारी किंवा सार्वजनिक पद भुषवित असेल त्यामुळे व्यक्तीच्या मुलभूत हक्कावर आक्रमण होत असेल तर त्या व्यक्तीच्या पदग्रहण करण्याविषयीची पृच्छा किंवा चौकशी करण्याचा अधिकार व्यक्तीला आहे.

V) उत्प्रेक्षण :-

"कनिष्ठ न्यायालयाकडे चालणारा खटला वरिष्ठ न्यायालयाने चालवावा अशी विनंती करणारा अर्ज म्हणजे उत्प्रेक्षण होय."

3. अनेक अधिकार भारतीय संविधानाच्या कलम 12 ते 35 मध्ये समाविष्ठ करण्यात आलेले आहेत.

3s) मुलभूत हक्काची अंमलबजावणी करण्याचे कार्य ही संसदेला आहे. राज्याच्या कायदेमंडळाला अधिकार नाही.

5 mark

## 2] मुलभूत कर्तव्य :-

मुलभूत अधिकाराबरोबर नागरिकांना आपल्या कर्तव्याची जाणिव व्हावी यासाठी मुलभूत कर्तव्या महत्वाची असतात. त्या समावेश 1976 मध्ये संविधाना मध्ये करण्यात आलेला आहे. मुळ संविधानात किंवा 1976 च्या अगोदर मुलभूत कर्तव्याचा समावेश संविधानामध्ये नव्हता. सरदार, स्वर्णसिंह समितीच्या शिफारशीनुसार 1976 मध्ये 42 वी घटनादुरुस्ती करुन संविधानाच्या कलम 51 (अ) मध्ये 10 मुलभूत कर्तव्याचा समावेश करण्यात आलेला आहे. साम्यवादी देशाकडून किंवा सोव्हिएत रशियाकडून भारताने मुलभूत कर्तव्याचा स्विकार केलेला आहे.

अधिकार आणि कर्तव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. अधिकाराशिवाय कर्तव्यास व कर्तव्याशिवाय अधिकारास काहीच महत्व नाही. देशातील नागरीकांना कर्तव्याशिवाय केवळ अधिकार दिल्यास देशात गोंधळ, गडबड, अराजकता निर्माण होते. तसेच नागरिकांना अधिकाराशिवाय केवळ कर्तव्य दिल्यास देशात गुलामगिरीचे वातावरण निर्माण होईल. देशात गोंधळ, गडबड, अराजकता, गुलामगिरी शोषण होवून नये यासाठी नागरीकांना अधिकारा बरोबर कर्तव्य बहाल करण्यात आले आहे.

देशातील नागरिकांनी मुलभूत कर्तव्याचे पालन केले नसल्यास त्यांना दंड शिक्षा नाही. मुलभूत कर्तव्य न्यायप्रविष्ठ नसतात. असे असले तरी देशातील प्रत्येक नागरिक कर्तव्याचे पालन करित असतोच. मुलभूत अधिकार देशातील व्यक्तींना व नागरीकांना देण्यात आलेला आहे तर मुलभूत कर्तव्य नागरिकांनाच देण्यात आलेले आहे. संविधानातील काही कर्तव्य नैतिक स्वरुपाचे तर काही नागरी स्वरुपाची कर्तव्य आहेत.

Scanned with CamScanner

2002 मध्ये 86 व्या घटनादुरुस्तीनुसार मुलभूत कर्तव्याच्या यादीमध्ये नवीन एका कर्तव्याचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे मुलभूत कर्तव्याची संख्या 11 झालेली आहे. त्याच्या विस्तार पुढीलप्रमाणे:

1) संविधान, राष्ट्रगीत व राष्ट्रध्वज याचा आदर राखणे
2) स्वातंत्र्य लढ्यातील प्रेरक ठरलेल्या उदात्त आदर्शांचे जतन आणि पालन करणे.
3) भारताचे सार्वभौमत्व एकात्मता याच्या सन्मान करणे आणि त्याचे संरक्षण करणे.
4) देशाचे संरक्षण करणे आणि अवाहन केले जाताच त्याला प्रतिसाद देवून राष्ट्राची सेवा करणे.
5) भारतामध्ये वर्गविरहीत आणि भेदभावरहित बंधुत्व भावना निर्माण करणे. आणि स्त्रियांच्या प्रतिष्ठेला बाधक प्रथा नष्ट करणे.
6) आपल्या देशाची संस्कृती आणि गौरवशाली परंपरेचे संरक्षण करणे.
7) जंगल, नदया, वन्यपशू या नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण व संवर्धन करणे. आणि सजीव प्राण्याबद्दल दया दाखवणे
8) वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद, ज्ञानार्जन आणि प्रगतीच्या भावनेचा विकास करणे.
9) सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे व हिंसाचारापासून दूर राहणे.
10) व्यक्तिगत आणि सामूदायीक उत्कर्षाकडे वाटचाल करणे.
11) वयाच्या 6 व्या वर्षापासून ते वयाच्या 14 व्या वर्षापर्यंत पालकाने आपल्या पाल्याला शिक्षणाच

संधी उपलब्ध करुन देणे.

३. या कर्तव्याचा समावेश संविधाना मध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत.

## ③ राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्वे :- ३६ ते ५१

भारतीय संविधानाच्या चौथ्या भागात कलम ३६ ते ५१ मध्ये राज्याची मार्गदर्शक किंवा नितीनिर्देशक तत्वाचा समावेश करण्यात आलेला आहे. भारताने या तत्वाचा स्विकार आर्यलँडच्या राज्यघटनेकडून केलेला आहे. मुलभूत हक्कांना न डावलता राज्यांनी करावयाच्या कामाचा समावेश मार्गदर्शक तत्वामध्ये करण्यात आला आहे. सरकारने अमूक गोष्ट करावी अशी तरतूद मार्गदर्शक तत्वामध्ये करण्यात आलेली आहे. ही सर्व मार्गदर्शक तत्वे राज्यासाठी आहेत. तर मुलभूत अधिकार व्यक्तिसाठी आहेत. ~~मुलभूत हक्कासारखे~~ मार्गदर्शक तत्वे न्यायप्रविष्ठ नाहीत. मुलभूत हक्क हे न्यायप्रविष्ठ आहेत. राज्यातील नागरिकांची सामाजिक आर्थिक राजकीय प्रगती व्हावी सर्वांना समान संधी प्राप्त व्हावी. समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठी राज्यांने काय करावे हे मार्गदर्शक तत्वामध्ये सांगण्यात आलेले आहे.

"राज्याची नितीनिर्देशक तत्वे म्हणजे सत्तारुढ पक्षाची एक प्रकारे आचारसहिंताचहोय" देशाला कल्याणकारी राज्याकडे घेवून जाण्याचा तो एक प्रभावी मार्ग आहे.

राज्याच्या नितीनिर्देशक तत्वाचे अभ्यासाच्या दृष्टि

Scanned with CamScanner

ने साधारणतः चार भागामध्ये वर्गीकरण करता येते.

① <u>अर्थिक तत्वे</u> / <u>कल्याणकारी तत्वे</u> :-

1) भेदभाव न करता सर्वांना उपजिवीकेची साधने उपलब्ध करून देणे.
2) देशातील भौतिक साधनांचे वाटप लोककल्याणा च्या दृष्टिकोनातून करावे.
3) स्त्री-पुरुषांना समान कामासाठी समान वेतन देण्यात यावे.
4) उत्पादन साधनांचे केंद्रिकरण होवू नये.
5) वृद्ध, अपंग, पेशंट, बेकार यांना मदत देणे.
6) कामगारांचे अरोग्य व लहान मुलांची प्रकृती बिघडेल असे काम करून घेवू नये.
7) अल्पवयीन बालकांचे नैतिक अधःपतन व आर्थिक शोषण होवू नये.
8) कामगारांच्या राहणीमानाचा दर्जा वाढवावा.
9) कुटीरोदयोग व ग्रामउदयोगांना प्रोत्साहन दयावे
10) शेती व पशूचे संवर्धन करण्यात यावे.

② <u>सामाजीक तत्वे</u> :-

1) 14 वर्षाखालील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यात यावे.
2) मागास जाती जमाती व दूर्बल घटकांना शैक्षणिक व आर्थिक सवलती देण्यात याव्यात.
3) मादक पदार्थावर बंदी घालावी
4) राष्ट्रीय व ऐतेहासिक स्मारकाचे संरक्षण करावे.

Scanned with CamScanner

5) पोष्टीक आहार जिवनमान सार्वजनिक आरोग्य वाढविण्यासाठी राज्यांनी प्रयत्न करावे.
6) पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा तसेच वन्यप्राण्यांच्या जिवन सुरक्षेच्या शासनाने प्रयत्न करावा. इ.

③ राजकीय / गांधीवादी तत्वे :-

1) राज्यात सर्वत्र ग्रामपंचायतीची स्थापना करावी.
2) सर्वासाठी एकच समान कायदा निर्माण करावा.
3) न्यायविभाग हा शासकीय विभागापासून वेगळा करण्यात यावा. न्यायालयांना स्वातंत्र्य देवून सत्तेचे विभाजन करण्यात यावे इ.

④ आंतरराष्ट्रीय तत्वे :-

1) जागतिक शांतता सुरक्षितता आणी सुव्यवस्था कायम रहावी असे परराष्ट्र धोरण स्विकारावे.
2) राज्याराज्यात परस्पर न्यायसंबंध प्रस्थापीत करण्यासाठी प्रयत्न करावे.
3) आंतरराष्ट्रीय नैतिकता, आंतरराष्ट्रीय कायदा याबाबत जनतेत आदराची भावना निर्माण करावी.
4) राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष शांततेच्या मार्गाने सोडवावे.

इ. मार्गदर्शक तत्वाच्या उल्लेख संविधानाच्या कलम 36 ते 51 मध्ये करण्यात आलेला आहे. याशिवाय इतरही काही कलमात राज्याची मार्गदर्शक तत्वे दिसून येतात.

**उदा** :-

1) 335 व्या कलमानुसार अल्पसंख्याकांना त्यांच्या मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण देण्याची तरतूद आहे.
2) 350 व्या कलमानुसार हिंदी भाषेचा विस्तार करण्याची तरतूद आहे.
3) 361 व्या कलमानुसार सरकारच्या नोकरीमध्ये नेमणूक करताना अनुसूचित जाती जमातींचे हक्क लक्षात घेतले जाण्याचे आश्वासन दिलेले आहे.
इ. अनेक तत्व राज्याला मार्गदर्शन करणारी आहेत.

Scanned with CamScanner